( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग ६ अ करिता )

क्र. पोमसं/८/६८०/ पदोन्नती-बदली (व.का.अ.-काअ.१७-१८)/३४ /२०१८. (सीई- १६६) मुंबई, दिनांक :- ११ ०७/२०१८

वाचा:- १.शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२A / १६-ब, दि.२९.१२.२०१७
२.या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/३६/र व का/विषयसुची/१०६/२०१७, दि.१४.०५.२०१८.

-: आदेश १ :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या शहर लिपिक संवर्गातील श्री. नरेश रामदास पवार, कार्यालय अधीक्षक (गट-ब, अराजपत्रित) यांचे **कार्यालय अधीक्षक (गट-ब, राजपत्रित)** असे नामाभिधान त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात* करण्यांत येत असून त्यांची नेमणूक का.क्र.८-अ येथेच करण्यांत येत आहे.

-: आदेश २ :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शहर लिपिक संवर्गातील खालील नमूद प्रमुख लिपिकांना त्यांच्या नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन नियुक्तीच्या ठिकाणी त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून **कार्यालय अधीक्षक (गट ब , अराजपत्रित) (वेतनश्रेणी रु. ९३०० - ३४८०० + ४३००/-)** या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात* पदोन्नती देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | नांव | सध्याचे नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीवरील नवीन नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. वामन सखाराम सुर्वे | पोमसं कार्यालय (कार्यासन क्रमांक १९) | पोमसं कार्यालय (कार्यासन क्रमांक १९-अ) | संवर्गातील रिक्त पदात |
| २. | श्रीमती मनिषा माधव गोडबोले | पोमसं कार्यालय (कार्यासन क्रमांक ३९) | पोमसं कार्यालय (कार्यासन क्रमांक ३३) | संवर्गातील रिक्त पदात |

(*उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेल्या पदोन्नत्या व करण्यात आलेले नामाभिधान हे शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९.१२.२०१७ अन्वये देण्यात आलेल्या आदेशानुसार सेवाज्येष्ठतेनुसार व विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.)

**२. उपरोक्त प्रमाणे पदोन्नती/ बदली झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणाची यादी पदमोचक लिपिकवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे किंवा संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता दयावी. त्याशिवाय त्यांना बदलीवर / पदोन्नतीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

३. उपरोक्त नमूद आदेश क्रमांक २ मधील पदोन्नत अधिकारी / कर्मचारी यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय/१०८२/सीआर/११००(२)/अेसईआर-३, दि. ०६/११/१९८४ नुसार पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर

वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील त्यांची वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम ११ (१) (अ) नुसार केली जाईल यांची त्यांनी नोंद घ्यावी.

**डी.डी. पडसलगीकर,**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

श्री. नरेश रामदास पवार, कार्यासन अधिकारी, का.क्र.८-अ
श्री. वामन सखाराम सुर्वे, प्रमुख लिपिक, का.क्र.१९
(मार्फत :- कार्यासन अधिकारी, का.क्र.१९)
श्रीमती मनिषा माधव गोडबोले, प्रमुख लिपिक, का.क्र.३९
(मार्फत :- कार्यासन अधिकारी, का.क्र.३९)

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत माहितीकरिता :-**

सहायक पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), म.रा., मुंबई
सर्व पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (र. व का. वगळून)
कार्यासन अधिकारी, का.क्रमांक ८-अ / १९ /१९-अ/ ३२/ ३३/ ३६/ ३९

२. पदोन्नती / बदली झालेल्या उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या संबंधीत कार्यालय प्रमुखांनी / कार्यासन अधिकाऱ्यांनी बदली अधिकारी / कर्मचारी हजर होण्याची प्रतीक्षा न करता पदोन्नतीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी **तात्काळ** कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास (का.क्र.०८ ला लक्षवेध करुन) सादर करावा.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई

२. पोलीस उप अधीक्षक यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे १ महिन्यांसाठी उपलब्ध करुन दयावेत.

**( अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.